स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ भविष्य निर्वाह निधी विश्वस्त मंडळ
भविष्य निर्वाह निधी विभाग
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत तळ मजला
धारावी रोड, माटुंगा, मुंबई ४०० ०१९

फोन नं २४०९२५३१/२४०३१४९८ फॅक्स नं.२४०९३११०.

क्र.लेवि/भनिनि/प्रशासन/ D | 135 दिनांक :- - 6 MAY 2022

## परिपत्रक क्रमांक - २२३

### भविष्य निर्वाह निधीच्या व्याजावरील आयकर कपाती बाबत

केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळाने पारित केलेले अध्यादेश क्रमांक - ९५/२०२१ F. NO. ३७०१४२/३६/२०२१ - TPL दिनांक - ३१.०८.२०२१ पासुन भविष्य निर्वाह निधीच्या व्याजावरील आयकर कपाती बाबत खालील प्रमाणे सुचना निर्गमित करण्यात येत आहे.

१) वरील अध्यादेश नुसार दि. ०१.०४.२०२१ पासुन भ.नि.नि. खाते हे करपात्र व अकरपात्र या दोन्ही विभागात विभागले जाईल, तसे वैयक्तीक भ.नि.नि लेखा स्लिप मध्ये ही दर्शविले जाईल. अध्यादेशाची प्रत CPF पोर्टलवर अपलोड केलेली आहे.

२) दिनांक ३१.०३.२०२१ पर्यंत कर्मचाऱ्यांच्या खात्यावर जमा असलेल्या भविष्य निर्वाह निधी रकमेवर कमावलेले कोणतेही व्याज हे आयकरास पात्र राहणार नाही.

३) दिनांक ०१.०४.२०२१ पासुन रु. २,५०,०००/- वरील मुळ पगार व महागाई भत्ता वरील १२% भ.नि.नि. चा कपात झालेला कर्मचारी वाटा, कर्मचाऱ्याने स्वइच्छेने कपात केलेला भ.नि.नि.चा वाटा व परतावा भ.नि.नि ची उचल परतफेड यावर कमावलेले व्याज हे आयकर कपातीस पात्र होईल.

४) कंपनीच्या वाट्यावरील भविष्य निर्वाह निधीवर आयकर लागू असणार नाही.

५) आयकर कपात हि ज्यावेळी व्याजाची रक्कम कर्मचाऱ्यांच्या खात्यात जमा होईल किंवा अंतिम प्रदानाच्या वेळेला कर्मचारी अंतिम प्रदानात व्याजाची प्रत्यक्ष रक्कम घेतील त्यावेळी केली जाईल.

६) कर्मचाऱ्यांनी भविष्य निर्वाह निधी मधुन घेतलेले परतावा व ना परतावा उचल सर्वप्रथम करपात्र योगदानातुन वजा केली जाईल व उर्वरित रक्कम हि अकरपात्र योगदानातुन वजा केली जाईल.

७) परतावा उचल ची पगारातुन केलेली वसुली हि आयकर कपातीस ग्राहय धरली जाईल.

८) ज्या कर्मचाऱ्यांचे पॅन कार्ड पगारपत्रकास लिंक असतील त्यांचे १० % प्रमाणे आयकर कपात करण्यात येईल तसेच ज्यांचे पॅन कार्ड लिंक नसेल त्यांचे २०% प्रमाणे आयकर कपात करण्यात येईल.

९) जे कर्मचारी २० % किंवा ३०% च्या स्लॅब मध्ये असतील तर त्यांनी भ.नि.नि विभागाने कपात केलेला १०% वरील आयकर स्वयं मुल्यांकन कराद्वारे भरावा.

१०) रु.२,५०,०००/- वरील कपात झालेल्या भ.नि.निच्या वाट्यावर कमावलेले व्याज रु. ५०००/- पेक्षा कमी असेल तर भ.नि.नि.विभागाकडुन TDS कपात केली जाणार नाही. परंतु, जर कर्मचाऱ्यांचे इतर आयकरास पात्र उत्पन्न रु. ५,०००/- किंवा त्यापेक्षा जास्त असेल तर त्यांनी रु.५,०००/- पर्यंत कमावलेल्या भविष्य निर्वाह निधी च्या व्याजावर आयकर स्वयं मूल्यांकन कराद्वारे भरावा.

06/05/22
सचिव
विश्वस्त मंडळ, म.रा.वि.मंडळ
भविष्य निर्वाह निधी विभाग

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

MAHARASHTRA STATE ELECTRICITY BOARD's CONTRIBUTORY PROVIDENT FUND

C.P.F. Section, Estrella Batteries Expansion Bldg., Ground Floor,
Dharavi Road, Matunga, Mumbai 400 019.
Phone No. 24092531 / 24031498 Fax No. 24093110 Email ID – cpfmseb.2011@gmail.com

Ref No. /CPF/D/135 Date:- 6 MAY 2022

## CIRCULAR NO. 223

**Sub - Regarding income tax deduction for Interest earn on provident fund Contributions.**

Following instructions are being issued regarding income tax deduction for interest earn on provident fund contributions, insertion of Rule 9D as per Notification No. 95/2021 / F370142/36/2021 - TPL Date - 31. 08. 2021 passed by Central Board of Direct Taxes. The Notification copy uploaded on portal.

1) From 01.04.2021 the employee PF A/c will be split into Taxable and Non-Taxable A/c. It is also shown in PLA Slip.
2) Any interest earned on the opening balance of provident fund amount credited to the employee's account as on 31.03.2021 is not eligible for income tax.
3) From 01.04.2021 interest earned on Employee Share of CPF Contribution of 12% on BASIC + DA, Extra CPF and repayment of refundable advance more than Rs. 2,50,000/- is eligible for Income Tax.
4) The Company Share of CPF Contribution is not liable for Income Tax.
5) TDS will be deducted at the time credit of Interest at the time of interest paid on taxable contribution in case of Final Settlement.
6) Withdrawal of Refundable and Non-Refundable Advance will be done from Taxable Contribution and remaining amount will be reduced from Non-Taxable Contribution.
7) Recovery of Refundable advance will be considered as PF contribution during financial year.

8) TDS of 10% will be deducted to the employees whose PAN is linked salary register and 20% will be deducted to the employees whose PAN is not linked to salary register.

9) Employees pertaining to 20% or 30% slab have to pay the self-assessment tax as MSEB CPF Trust is going to deduct only 10% TDS on interest earned on taxable contribution as per Income Tax Act.

10) If the interest earned on taxable Contribution is less than Rs. 5,000/- then no TDS will be deduct by MSEB CPF Trust. But if the total taxable income of employee is Rs.5000/- or more, then employee have to pay the self-assessment tax on interest earned from taxable pf contribution for less than Rs. 5,000/-.

06/05/2022
M. M. Kharate
Secretary to the Board of Trustees,
of M.S.E.B's C. P. Fund,

Copy to:
As per mailing list